# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल

क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपिल क्र.८०५/२०२१/नाशिक

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.नरेंद्र मधुकर लचके<br>रा.बालिका विद्यालयाजवळ, वॉर्ड नं.४, बाजार सर्कल, श्रीरामपूर जि.अहमदनगर ४१३७०९. | शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, खंबाळा ता.इगतपुरी, जि.नाशिक. | सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, इगतपुरी ता.इगतपुरी, जि.नाशिक. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक ०९/११/२०२३**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१/१२/२०२० | -- | -- | १२/०१/२०२१ | १८-०१-२०२१ | २६/०२/२०२१ |

अपिलार्थी यांनी दि.०४/०३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून एकतर्फी निकाल दिला असे कारण नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते व इतर पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"आपल्या विभागामार्फत २०१८ ते २०२० या आर्थिक वर्षात सी.आर., एस.एल.आर., तसेच पुल, रस्ते, इमारती इ. झालेल्या कामांची वर्कऑर्डर, कामे केलेल्या एजन्सीला व सोसायटयांना अदा केलेल्या रकमांची माहिती, सदरील कामांपैकी काही कामे अपूर्ण स्थितीत असल्यास त्याबाबतची सविस्तर कारणे याबाबत माहिती मागितली होती."

४. आज सुनावणीवेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दिनांक नसलेले लेखी निवेदन सादर केले. सदर लेखी निवेदनात अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, दि.०४/०३/२०२१ रोजी आपल्या कार्यालयाकडून सदर प्रकरणी मला मूळ माहिती अधिकार अर्जातील मागणी केलेली माहिती देण्यात आली. उक्त माहितीने मी समाधानी असून, राज्य माहिती आयोगाकडील विषयांकीत द्वितीय अपिल क्र.८०५ निकाली काढण्यास माझी हरकत नाही. माझी याबाबत कोणतेही हरकत राहणार नाही.

सबब, अपिलार्थी यांच्या उपरोक्त नमूद लेखी निवेदनाच्या अनुषंगाने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.८०५/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

( भुपेंद्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

---

जावक क्र. ओ-१४८ दिनांक - 01 FEB 2024